ISSN–2277- 8721

OPEN ACCESS

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# विधवांचे प्रश्न आणि धोंडो केशव कर्वे यांचे कार्य

**प्रा. ज्योती राऊत**

*सहाय्यक प्राध्यापक*

*श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, पुणे ५२*

*ईमेल आयडी : jyotirhistory@gmail.com*

**सारांश**

*'महर्षी धोंडो केशव यांचे विधवांच्या संदर्भातील कार्य' या विषयावरील शोधनिबंध लिहिताना पुढील मुद्यांवर भर दिलेला आहे. महर्षी कर्वे यांच्या कार्याचा आढावा घेण्यापूर्वी 'विधवा' ही संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. 'विधवा' या संज्ञेतून एक सांस्कृतिक विश्व समोर उभे राहते. समाजातील एक दाहक वास्तव, क्रूर पद्धती, पुरुषसत्ताक पद्धतीतून होणारा अन्याय आणि शेकडो वर्षांची परंपरा या सर्व गोष्टी ध्वनित करणारी ही संज्ञा आहे. मराठी विश्वकोश खंड -१६ नुसार 'विधवा' या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. 'पती व पत्नी यांचे वैवाहिक जीवन हे त्यांच्यापैकी एका व्यक्तीच्या मृत्यूमुळे संपुष्टात येते. जिचा पती निधन पावला आहे व जिने पुन्हा लग्न केलेले नाही, अशी स्त्री म्हणजे विधवा होय.'*

*प्राचीन काळातील स्मृतींपासून ते एकविसाव्या शतकापर्यंतचा धावता आढावा घेतल्यानंतर विधवांची सामाजिक प्रतिष्ठा पुनर्स्थापित केली पाहिजे असे वाटणारे कर्वे हे अलीकडच्या काळातील सगळ्यात मोठे कृतिशील विचारवंत होत. सामाजिक विचार मांडणे सोपे परंतु त्याबरहुकूम चालणे अत्यंत अवघड असते. महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे अग्रणी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना विधवा पुनर्विवाह क्षेत्रात सामाजिक कृती करण्याची संधी आलेली असता त्यांना ती घरच्या दबावामुळे साधता आली नाही. अशा वेळेस महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत असणाऱ्या आणि जे अजूनही महर्षी व्हायचे होते, त्या धोंडो केशव कर्वे यांनी ही संधी साधली. शिक्षण हीच एकमेव गोष्ट विधवांच्या, स्त्री-पुरुषांच्या, समाजाच्या, देशाच्या परिस्थितीत बदल घडवून आणू शकते यावर कर्वे यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी अनाथ बालिकाश्रम ते भारतातील पहिले महिला विद्यापीठ एवढा मोठा पल्ला गाठला.*

*स्त्रियांचे प्रश्न फक्त स्त्रियाच सोडवू शकतात असा कोणताही अभिनिवेश न बाळगता शिक्षणाच्या माध्यमातून शेकडो वर्षांच्या वाईट प्रथा, परंपरांना मागे टाकता येते हे कर्वे यांनी स्वतःच्या उदाहरणातून व संस्थेच्या स्थापनेतून दाखवून दिले. समाजमन संकुचित करणाऱ्या प्रश्नांना पर्यायी विधायक उत्तर कसे देता येते याचा शोध या शोधनिबंधात घेतला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम दर्जाची साधने वापरली आहेत. या साधनांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून मांडणी केलेली आहे.*

**मुख्य शब्द**: *विधवा, शिक्षण, वैधव्य इत्यादी.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीवरून ठरते. वेदकाळात उच्च सामाजिक दर्जाचे जीवन जगणाऱ्या स्त्रीला एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या वाटचालीत कमालीचे हीनत्व कसे येत गेले हे पाहणे आवश्यक ठरते.

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

वेद काळातील स्त्रिया उच्च सामाजिक दर्जाचे जीवन जगत होत्या हे वैदिक आर्यांच्या स्त्री देवता सूक्तांमध्ये, स्त्री देवतांच्या आलेल्या वर्णनांवरून कळते. कोणत्याही देवाला स्त्री तत्त्वाशिवाय पूर्णत्व येत नाही हे अर्धनारीनटेश्वर मूर्तीच्या माध्यमातून समजते. समाजात मानाने जगणारी, बौद्धिक व आध्यात्मिक प्रगती करणारी, 'उपनयन' संस्कारानंतर अध्ययनाला सुरुवात करणारी, सूत्रे मुखोद्गत असणारी, अध्यापनाची जबाबदारी सांभाळणारी व सोळा वर्षांपर्यंत शिक्षण घेऊन अनुरूप पतीची निवड करणारी अशी स्वतंत्र मताची व विचारांची स्त्री पुढे या सगळ्यांपासून दूर होत गेली. विवाह हा पवित्र संस्कार होता तर वैधव्य ही नैसर्गिक गोष्ट म्हणून मान्य व्हायला हवी होती. मात्र तसे झालेले दिसत नाही. स्त्रियांचे दुय्यमत्व, त्यांच्यावरील बंधने उत्तरोत्तर अधिक घट्ट होत गेलेली दिसतात. विवाहित स्त्रियांच्या वाट्याला येणारा मानसन्मान विधवांच्या वाट्याला येत नव्हता. वैदिक काळात स्त्रीला वैधव्य आले तर दुसरा अनुरूप सहचर निवडण्याची परवानगी होती. अथर्ववेदात पुनर्विवाहाचा स्पष्ट उल्लेख आहे. पुनर्विवाह न करता राहण्याचे स्वातंत्र्य देखील तिला होते. अशी विधवा कष्टमय जीवन जगत नसे. याचे कारण मुळात विवाहित स्त्रीचे संसारातील स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते. म्हणून त्यांच्या पश्चातही ती मानाने जगत होती. पती-पत्नीच्या समानतेविषयीचे अनेक उल्लेख वैदिक काळातल्या धार्मिक ग्रंथांत वाचायला मिळतात. काही उदाहरणे -

१) 'ऋग्वेदात पत्नीला पतीचे अर्धांग मानलं आहे.' (ऋ. ५ .६१.८)

२) 'तैतिरिय ब्राह्मण' मध्ये अर्धो वा एष - आत्मनो यत पत्नी' म्हणजे पत्नी हे पतीच्या आत्म्याचं अर्ध आहे असं म्हटले आहे.' (तै. बा. ३.३.३.५)

वेदोत्तर काळात स्त्रियांचा पतीच्या बरोबरचा धार्मिक कार्यातला सहभाग कमी होत गेला. तसा तिचा समाजातील दर्जा, पुरुषांच्या बरोबरीचे स्थान, आदर कमी होत गेला. स्त्रियांची यज्ञातील कर्मे तिला डावलून पुरोहितच करू लागले. (सूत्रकाळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावू लागला) स्त्रियांना वेदपठणाला व यज्ञकर्माला अनाधिकारी ठरवण्यात आले. यज्ञकर्मात 'सोमप्राशन' हे महत्त्वाचे कर्म होते. आर्य उत्तरेकडून दक्षिणेकडे सरकू लागले. दक्षिणेकडील उष्ण प्रदेशात नाजूक प्रकृतीच्या स्त्रियांना सोमप्राशन सोसत नाही म्हणून स्त्रियांनी सोमप्राशनात भाग घेऊ नये, असा दंडक घालण्यात आला. पुढे सर्वच यज्ञकृत्यांतून स्त्रियांचे अधिकार कमी करण्यात आले. वेदमंत्रोच्चारात चूक झाल्यास पाठकाचा नाश होतो या समजुतीमुळे स्त्रियांना वेदाध्ययनाला मनाई करण्यात आली. यज्ञ करणारी, वेदसूक्ते रचणारी पुढे अविद्या ठरली. स्त्रीच्या बुध्दीची वाढ खुंटून ती फक्त पुरुषांच्या भोगेच्छा पूर्तीचे साधन उरली.

पुढे स्त्रियांचे उपनयन व शिक्षण थांबल्याने आठवे वर्ष विवाहाचे वय ठरून 'बालविवाह' सुरू झाले. विवाह हाच कन्येचा उपनयन संस्कार, पती हाच तिचा गुरु व पतीगृह हेच तिचं गुरुकुल व घरकाम हेच यज्ञकृत्य हे तिला सांगितले गेले. याज्ञवल्क्य ऋषीने बालपणी कन्येचा विवाह न करणाऱ्या पित्याला तिच्या प्रत्येक ऋतुकालाच्या वेळी भ्रूणहत्येचे पाप लागते, अशी भीती निर्माण केली. या बालविवाहाच्या पद्धतीमुळे समाजात बालविधवा होण्याचा धोका वाढला. मात्र तो धोका लोकांनी विशेष मनावर न घेता तो स्त्रीच्या नशिबाचा भाग म्हणून स्वीकारला. बालविवाहाची प्रथा एकोणिसाव्या शतकाअखेर पर्यंत चालू राहिली आणि बालविधवांचे जीवन अधिकाधिक कष्टमय बनले. पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्रीला व्रतस्थ जीवन जगण्याची सक्ती केली जात असे. वेदकाळी प्रचलित असलेली पुनर्विवाहाची पद्धत मनुस्मृतीच्या काळी बंद झाली. कोवळ्या वयात वैधव्य आले तरी तिने संन्यस्त राहावे, अशी सक्ती करण्यात आली. मनु विधुराला पुनर्विवाहाची परवानगी देतो आणि विधवेवर ब्रह्मचर्याची सक्ती करतो. एकूणच स्त्री पुरुषापेक्षा वरचढ होईल या असुरक्षिततेच्या भावनेतून पुरुषसत्ताक धर्मशास्त्र, उपनिषद संहिता, मनुस्मृति यांनी तिला दडपण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केलेला दिसतो. क्षत्रिय वर्गातील स्त्रियांना शिक्षण, धर्मचर्चा, युद्ध, स्वयंवर, राज्यकारभार, कलाशिक्षणाची मुभा होती. कमी अधिक प्रमाणात सर्वच धर्मसंस्थापक व धर्म दोघांनीही स्त्रीवर अन्याय केला. स्त्रीयांना दुय्यम स्थानावरच ठेवण्यात आले.

**'विधवा'**

'पती व पत्नी यांचे वैवाहिक जीवन हे त्यांच्यापैकी एका व्यक्तीच्या मृत्यूमुळे संपुष्टात येते. जिचा पती निधन पावला आहे व जिने पुन्हा लग्न केलेले नाही अशी स्त्री म्हणजे विधवा होय.'

परंपरागत समाजामध्ये विधवा स्त्रीचे जीवन विशिष्ट नीतीनियमांनी नियंत्रित होते. विधवेचे जीवन काटेकोर रूढी व बंधनांनी बंदिस्त होते. पतीनिधनामुळे स्त्रीचे कौटुंबिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा संपुष्टात येऊन कुटुंबातील तिच्या स्थानाला दुय्यमत्व प्राप्त होत असे. मनुस्मृतीत स्त्रियांवर अनेक बंधने व त्यांची वर्णने दिसतात.

मनु म्हणतो,

"पिता रक्षती कौमारे भर्ता रक्षति यौवने।

रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति।"

अर्थ - स्त्रीचे रक्षण लहानपणी पिता करतो. तरुणपणी पती करतो व म्हातारपणी पुत्र करतात. स्त्री ही स्वातंत्र्याने राहण्यास योग्य नाही.

मात्र पत्नीच्या मृत्यूनंतर पुरुषाला पुनर्विवाह करण्याची व गृहस्थधर्म चालविण्याची परवानगी होती हे खालील वर्णनाद्वावारे समजते-

"अनेन विधिना नित्यं पश्चयज्ञान्न हापयेत।

द्वितीयमायुषो भागं कृतदारो गृहे वसेत॥"

(मनुस्मृती - अध्याय ५ वा)

बहुपतिकत्व आणि दिराशी विवाह हे मान्य असलेल्या समाजात विधवा स्त्रियांच्या संदर्भात काही समस्या फारशा दिसत नाहीत.

"सौराष्ट्रातील काठेवाड भागातील हाती जमातीत विधवेला पुनर्विवाह करता येतो. ती आपल्या दिराशी किंवा कुटुंबाबाहेरच्या पुरुषाबरोबर लग्न करू शकते. दक्षिण भारतातही कानडा जिल्ह्यातील येल्लापुर, हल्लाळ व सुपा या ठिकाणच्या जाती-जमातींमध्ये विधवा विवाहांना मान्यता होती. विधवा विवाह रात्रीच्या वेळी होत असत. ब्राह्मण समाजाव्यतिरिक्त इतर जातींमध्ये पुनर्विवाहाला मान्यता असली तरी प्रतिष्ठा व सामाजिक मानमरातबाच्या चुकीच्या कल्पनांमुळे कनिष्ठ जातींमध्ये देखील पुढे पुनर्विवाह गौण ठरवले गेले. अशा पुनर्विवाहाला 'मोहतूर' वा 'पाट लावणे' म्हणत. या विधीला प्रतिष्ठा नसे. तसेच मंत्रपठण किंवा मांडव घालून हा विवाह साजरा होत नसे."

भारतीय धर्मशास्त्रे व नीतिनियमांनी विधवांचे जीवन जखडून टाकले होते. विधवांच्या दैनंदिन जीवन व्यवहारांवर कडक बंधने घातलेली आढळतात. या बंधनांचाच एक भाग म्हणजे केशवपन. विधवा स्त्रीने अलंकार घालू नयेत, सौंदर्य वाढविणारे केस वाढवू नये, उत्तम वस्त्र परिधान करू नयेत, कारण परपुरूषाची नजर तिच्याकडे जाऊ नये हा दृष्टिकोन सर्वत्र आढळतो. उच्च जातींमध्ये केशवपनाची चाल प्रामुख्याने प्रचलित होती. पुनर्विवाह बंदी बरोबरच बालविवाह, जरठ-बालविवाह, केशवपन, सती प्रथा या प्रथांमुळे विधवांचे प्रश्न अधिकच गंभीर बनले. पतीच्या मृत्यूनंतरही त्याचा आपल्या पत्नीवर हक्क असतो, त्यामुळे जिवंत पत्नीला पतीच्या चितेवर जाळण्याचे प्रकार सुरू झाले. ही सतीप्रथा एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत विधवा स्त्रियांना भोगावी लागली. या प्रथेला धार्मिक अधिष्ठान दिले गेले तरी कोणत्याच धर्मग्रंथात या प्रथेचा स्पष्ट पुरस्कार दिसत नाही. सतीप्रथेचा मार्ग स्त्रियांनी बहुधा परकीय आक्रमणांच्या प्रसंगी धर्मांतर आणि अत्याचार यांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी स्वीकारला असावा. उदा.- राजस्थानातील 'जोहार' प्रथा.

समाजातील विधवांच्या प्रश्नांचे स्वरूप हे बालविवाह, सतीप्रथा, केशवपन अशा अनिष्ट रुढींशी निगडीत असल्याने मानवतेच्या व नैतिकतेच्या

दृष्टीकोनातून विधवांच्या समस्या सोडविणे आवश्यक होते. त्यादृष्टीने एकोणिसाव्या शतकात पुरोगामी विचारांच्या, नवशिक्षित सुधारकांकडून सुधारणांसाठी कसोशीने प्रयत्न सुरू झाले. केशवपन या अघोरी व अशास्त्रीय रूढी विरोधात लेखन केले गेले. सतीच्या अमानुष प्रथेविरुद्ध चळवळ उभी राहिली. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नातून १८२९ मध्ये कायद्याने सतीच्या चालीवर बंदी घालण्यात आली. विधवांचे समाजातील मोठे प्रमाण हे लहान वयातील लग्नामुळे आहे, त्यामुळे बालविवाह बंद व्हावेत यासाठी 'संमतीवय' वाढविण्याचे प्रयत्न शेठ बहरामजी मलबारी यांनी सुरू केले. विलायतेत जाऊन मलबारी यांनी 'संमतीवयाचा कायदा' करण्यासाठी प्रयत्न सुरू करून नऊ कलमे तयार केली. या कलमांमध्ये स्त्रियांचे जगणे सुकर करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणारी कलमे होती. विधवा विवाहांना कायद्याच्या मान्यते बरोबरच एखाद्या विधवेने पुन्हा लग्न केल्यास पूर्वीच्या नवऱ्याची संपत्ती तिला मिळावी, असा तिच्या भविष्याचा विचारही त्यांनी केला. या नऊ कलमांमध्ये लग्नासंबंधी संमतीवय, घटस्फोट, पुनर्विवाह, विधवेचे शिक्षण व अर्थार्जन, विधवांना पतीच्या संपत्तीत अधिकार, स्त्रीच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक गरजांकडे समाजाने लक्ष द्यावे असा सर्वार्थाने विचार करणारे मलबारी हे द्रष्टे होते असे जाणवते.

विधवांच्या पुनर्विवाहाबाबत सुधारकांनी चळवळ सुरू केली. १८४० मध्ये महाराष्ट्रात विष्णुशास्त्री बापट या सुधारकांनी 'पुनर्विवाह प्रकरण' लिहून या विषयाला चालना दिली. स्त्री शिक्षण, पुनर्विवाह व विधवाविवाह या विषयांसाठी धर्मग्रंथांचे परिशीलन करून सुधारणांचा पुरस्कार सुरू केला. लोकहितवादींनी इ.स.१८४८ पासून बालविवाह प्रथेविरोधात चळवळ सुरू केली होती. विधवांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पुढे दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी विधवा पुनर्विवाहासंबंधी शास्त्रीय विवेचन केले. विष्णुशास्त्री पंडित यांनी 'इंदुप्रकाश' साप्ताहिकातून बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठ-कुमारी विवाह इत्यादी अमानुष रुढींविरोधात सांगोपांग व विवेचक लेख लिहून सुधारणा विरोधकांना निष्प्रभ करण्याचे प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्राप्रमाणे बंगालमध्येही स्त्री प्रश्नावर अगोदरच कार्य सुरू झाले होते. १८५५ मध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहाची मागणी केली. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा मंजूर झाला. त्यामुळे ते विधवा विवाह कायद्याचे ते जनक ठरले. बंगालला सामाजिक सुधारणांचा प्रकाश त्यांनी दाखवला. त्यांनी धर्मशास्त्राचे सूक्ष्म परिशीलन करून सनातनी पंडितांना उत्तरे दिली. विधवा विवाहाच्या कायद्याने विधवेची संतती कायदेशीर ठरली. पुढे त्यांनी आपल्या मुलाचा विवाह बालविधवेशी केला. स्त्री शिक्षणाचे समर्थन करून कलकत्ता येथे गर्ल्स स्कूलची त्यांनी स्थापना केली.

महाराष्ट्रात जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी यांनी या कार्याला वाहून घेतले. १८६५ मध्ये मुंबईत 'विधवाविवाहोत्तेजक मंडळा'ची स्थापना झाली. १८६६ मध्ये विष्णुशास्त्री पंडित यांनी पुण्यात वरील मंडळाची एक शाखा स्थापून विधवाविवाह चळवळीला क्रियाशील रूप दिले. विधवाविवाहोत्तेजक संस्थेच्या वतीने विष्णुशास्त्री पंडितांनी अनेक विधवाविवाह घडवून आणले. १८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या कालखंडाला स्त्री जीवनातील 'उध्दारकालखंड' असे म्हणता येईल. या काळातील साहित्यातूनही तत्कालीन स्त्री जीवन प्रकटू लागले. मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी म्हणून बाबा पदमनजी यांनी लिहिलेली 'यमुना पर्यटन' अथवा 'हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण' ही कादंबरी १८५७ मध्ये प्रसिद्ध झाली. विधवांच्या आयुष्याची अनेक परिमाणे या कादंबरीतून पुढे येतात. विधवांची दयनीय परिस्थिती पुढे येते. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री – पुरुष तुलना' या छोटेखानी पुस्तकात स्त्री दास्यत्वाचा प्रश्न नेमकेपणाने मांडलेला दिसतो. ताराबाईंनी जहाल व सडेतोड शब्दांत सगळ्या पुरूषांना जाब विचारलेला आहे. ताराबाई एके ठिकाणी पुरूषांना विचारतात, "स्त्रिया सती जाऊन तुम्ही त्यांच्या मागे गवऱ्या वळायला कां राहता? तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर कां सती जाऊ नये बरे?" ताराबाई पुरूषवर्गाला "हा निबंध लक्ष देऊन वाचा, अलक्ष करु नका. तसेच निःपक्षपतीपणे योग्य गोष्टींचा विचार करा" असे सांगतात.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य**

पुनर्विवाहाच्या कार्यातील महत्वपूर्ण योगदान म्हणजे 'आधी केले मग सांगितले' असे दाखवून देणाऱ्या महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे उर्फ अण्णासाहेब यांनी आयुष्यभर अत्यंत निष्ठापूर्वक स्त्रियांची दुःस्थिती सुधारण्याचे व निरंतर स्त्री शिक्षणाचे कार्य केले. अण्णांना एकशे चार वर्षांचे उदंड आयुष्य लाभले. त्याचा अण्णांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी दीपस्तंभासारखा उपयोग केला. अण्णांच्या समोर समाजसुधारणा, स्त्री-शिक्षण, बालविवाह विरोध, विधवांच्या पुनर्विवाहासाठीचे प्रयत्न, सतीप्रथा विरोध, केशवपन, जरठ-कुमारी विवाह विरोध अशा कार्याचा जोर सुरू होता. स्त्री सुधारणेच्या संदर्भात अण्णांनी जो मार्ग आखला, त्या मार्गावर ते निष्ठेने शेवटपर्यंत चालत राहिले. व्यक्तिगत पातळीवर आपल्या हातून काहीतरी सत्कृत्य व्हावयास हवे, अशा अंतःप्रेरणेतून अण्णांनी जीवनकार्य केले.

अण्णांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी मुरुड येथे झाला. त्यांची आई लक्ष्मीबाई व वडील केशव उर्फ केसोपंत हे दोघेही सद्वर्तनी, सदाचारी, कष्टाळू व धार्मिक वृत्तीचे होते. अण्णांच्या वडिलांनी काटेकोर व दक्ष राहून मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. आई-वडिलांच्या स्वाभिमानी, काटकसरी जीवनाचा खोलवर परिणाम अण्णांवर कायमचा झाला. अण्णांचे प्राथमिक शिक्षण मुरुड येथेच झाले. त्यांना लहानपणी विनायक लक्ष्मण सोमण या हुशार, निःस्वार्थी व लोकसेवेचा वसा देणाऱ्या शिक्षकांचा सहवास लाभला. अशा शिक्षकांकडून अण्णांवर कळत - नकळत संस्कार झाले. लहानपणी अण्णा दिसायला कृश, मात्र त्यांची वाणी खणखणीत, शुद्ध आणि स्पष्ट होती. अण्णांच्या बालवयात सोमण गुरूजींनी देशकार्याचे बाळकडू पाजले. अण्णांची ज्ञानसाधना कष्टमय होती. शिकवण्या घेत, शिष्यवृत्ती मिळवत, अत्यंत काटकसरीने स्वतःचा चरितार्थ चालवत अण्णांनी शिक्षण घेतले. ते १८८१ मध्ये मॅट्रिक व १८८४ मध्ये बी. ए. झाले.

अण्णांच्या आयुष्यात नरहर बाळकृष्ण जोशी या त्यांच्या मित्राला खूप मोठे स्थान आहे. अण्णांच्या विरुद्ध स्वभावाचे नरहर जोशी मनाने खूप कणखर, आत्मसंयमी व निर्भिड होते. या मित्राच्या सहवासाने अण्णांची विवेचक चिकित्सक शक्ती वाढली व विचारक्षेत्रही विस्तारले. अण्णांचा विवाह वयाच्या पंधराव्या वर्षी राधाबाई यांच्याबरोबर झाला. आपली पत्नी राधाबाई, बहीण अंबाताई या दोघींना अण्णांनी लिहिणे व वाचणे शिकवले. त्यांच्या या कार्यात घरच्यांनी कधीच अडथळा आणला नाही. लहानपणापासूनच अण्णांना शिक्षण, ज्ञानदानाची आवड होती. ते लोकांना वृत्तपत्र वाचून दाखवत. शिक्षणासाठी कर्ज काढणे, ते फेडण्यासाठी शिकवण्या घेणे, पायपीट करत कष्टातून शिक्षण घेणे या गोष्टी अण्णांनी लहानपणापासून केल्या. निरपेक्ष भावनेतून दानधर्म करण्याची सवय अण्णांना होती. शिकवण्या घेऊन किंवा शिष्यवृत्तीतून काही पैसे बाजूला ठेवून गरजवंतांना निरपेक्षपणे मदत करण्याची अण्णांना सवय होती. अण्णांनी आपला थोरला मुलगा रघुनाथची अल्प खर्चात मुंज करून उरलेली रक्कम सत्कार्यासाठी वापरण्याच्या हेतूने मुरुडफंडात भरली व त्या रकमेच्या व्याजाचा उपयोग मुरुडगावी इंग्रजी शिक्षण आणि स्त्री शिक्षण यांना उत्तेजन देण्यासाठी केला. यावरून त्यांची 'स्त्री शिक्षणाची तळमळ' खूप आधीपासून कृतीतून व्यक्त झाल्याचे दिसते. अण्णांच्या पत्नी राधाबाईंचे निधन लवकर झाले. त्यावेळेसही त्यांच्या उत्तरक्रियेला फारसा खर्च न करता राधाबाईंच्या नावे पाचशे रुपयांची रक्कम 'मुरुडफंडाला' स्त्री शिक्षण व इंग्रजी शिक्षणासाठीची अट घालून देण्यात आली. अण्णांची सामाजिक बांधिलकीची निष्ठा आयुष्यभर जागृत होती. केवळ स्वतःच्या कुटुंबापुरता विचार अण्णांनी कधीच केला नाही. अण्णांना स्वतःचे शिक्षण घेताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. तेव्हा ते लक्षात ठेवून अशा अडचणी दुसऱ्या मुलांना येऊ नयेत म्हणून अण्णांनी मुरुडफंड निर्माण करून मुलांच्या शिक्षणाची सोय केली होती. अण्णांची समाजविषयक कर्तृत्वाची जाणीव वरील अनेक गोष्टींतून दिसते.

मुंबईतील तेरा वर्षांच्या वास्तव्यानंतर अण्णा १५ नोव्हेंबर १८८१ रोजी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात रूजू झाले. १८५६ मध्ये विधवा

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

*Original Research Article*

विवाहाला मान्यता देणारा कायदा मंजूर झाला तरी प्रत्यक्ष ही सुधारणा अमलात येणे कठीण होते. सामाजिक बहिष्काराच्या भीतीपोटी सुधारणेचे विचार पटूनही आचरणात येताना दिसत नव्हते. महाराष्ट्रात संस्थात्मक पातळीवर विधवा विवाहाचा पुरस्कार करून अनेक समाजसुधारकांनी वेगवेगळ्या पातळीवर काम करण्यास सुरुवात केली होती. विष्णुशास्त्री पंडित यांनी अनेक पुनर्विवाह लावले होते. या सगळ्या घटना वर्तमानपत्रातून अण्णांच्या वाचनात येत होत्या. १८८३ च्या केसरीच्या अंकातील विधवांच्या स्थितीचे एक हृदयद्रावक पद अण्णांच्या वाचनात आले होते. ते त्यांनी पाठ केले. हे पद अण्णांचे मित्र सीतारामपंत देवधर यांनी लिहिले होते. या काव्याचा अण्णांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. या पदाचा मथितार्थ, साठीच्या पुरुषाला दुसऱ्या लग्नाला परवानगी द्यायची आणि पाच वर्षाच्या विधवा मुलीला मात्र तिचे वैधव्य हे पूर्वजन्मीचे पाप आहे असे सांगायचे, विधवा मुलींना, स्त्रियांना त्यांचा काही दोष नसताना दुःखसागरात लोटायचे हे क्रूर कर्म असून विधवांच्या पुनर्विवाहाला परवानगी द्यावी, असा विचार व्यक्त करणारे हे पद अण्णांना स्वस्थ बसू देत नव्हते. निराधार, विधवा स्त्रियांसाठी काहीतरी करण्याची आंतरिक इच्छा त्यांचे जीवनकार्य बनली.

विधवांच्या भीषण परिस्थितीचे वर्णन अण्णांच्या पत्नी आनंदीबाई (गोदुताई) कर्वे यांनी 'माझे पुराण' या आत्मचरित्रात केले आहे. विधवापणाची जाणीव अनेक घटनांमधून कशी होती गेली हे त्या सविस्तर वर्णन करतात. लहानपणी नवरा जाण्याचे दुःख कळत नाही, पण वैधव्य अनुभवताना वेळोवेळी जाणीव होते. केशवपनासारख्या घटना दर महिन्यांला अनुभवताना विधवांची एवढी विटंबना का व्हावी? हा प्रश्न त्यांना पडतो. राधाबाईंच्या मृत्यूनंतर पुनर्विवाह केलाच तर बालविधवा असणाऱ्या मुलीशीच करण्याचा ठाम निश्चय अण्णांनी केला. आगरकरांच्या सुधारणावादी विचारांचा, न्या. रानडे यांच्या समतोल विचारांचा तर रा. गो. भांडारकरांच्या विवेकवादी विचारांचा प्रभाव अण्णांवर होताच. याशिवाय सोमण गुरूजींचे बालपणातील संस्कार, नरहर जोशी या मित्राबरोबर विधवांसंदर्भात झालेले संवाद, स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव यातून अण्णांचे पुनर्विवाहाबद्दलचे मत आग्रही होत गेले.

नरहर जोशी यांच्या वडिलांशी झालेल्या चर्चेतून व कल्पनेतून अण्णांनी मित्राच्या बहिणीशी, गोदुताईशी विवाह करण्याचे ठरविले. गोदुताई वयाच्या आठव्या वर्षीच बालविधवा झाल्या होत्या. पुढे त्या 'शारदासदन' या पंडिता रमाबाई यांच्या मुंबईतील संस्थेत दाखल झाल्या होत्या. अण्णांबरोबर पुनर्विवाहाच्या वेळी गोदुताई अठ्ठावीस वर्षांच्या होत्या. अण्णांच्या विधवा पुनर्विवाहामुळे त्यांच्या मुरुड गावी त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. या घटनेने अण्णांना दुःख न होता त्यांचा स्त्रीमुक्तीसाठीचा निर्धार मात्र उत्तरोत्तर वाढला.

विधवा विवाहाच्या कार्याचे पाऊल पुढे पडण्यासाठी 'विधवाविवाहोत्तेजक मंडळ' स्थापन झाले. तेव्हा लोकांना न दुखावता विधवा विवाहाचे कार्य व्हावे म्हणून संस्थेचे नाव 'विधवा - विवाह - प्रतिबंध - निवारक मंडळी' ठेवले गेले. विधवा विवाहाला लोकांचा विरोध असला तरी त्यांच्या शिक्षणाला नव्हता. तेव्हा विधवांचा प्रवास शिक्षणातून स्वावलंबनाकडे व्हावा या हेतूने १८९६ मध्ये अण्णांनी 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेची स्थापना केली. पुण्यात १८९९ मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीमध्ये आश्रम सदाशिव पेठेतून हिंगणे येथील गणेश गो. गोखले यांनी दिलेल्या सहा एकर जागेमध्ये स्थलांतरित झाला. इथे अनेकींचे अश्रू पुसले गेले, कित्येकींचे जीवन फुलले. पार्वतीबाई आठवले, वेणूताई नामजोशी, सीताबाई आण्णिगेरी, काशीबाई देवधर, बनुताई देशपांडे, आनंदीबाई मराठे, दुर्गाबाई किर्लोस्कर, कृष्णाबाई ठाकूर अशा आश्रमात आलेल्या महिलांनीच पुढे आश्रमाला मोलाची मदत केली. स्त्रियांच्या प्रौढ विवाहाला उत्तेजन देण्यासाठी 'ब्रह्मचर्य फंड' ते निष्काम - कर्म - मठापर्यंत झालेली संस्थेची वाटचाल ही अण्णांची ध्येयनिष्ठा, सचोटी, चिकाटी, सद्चारित्र्य, नि:स्वार्थीपणा याचीच पोचपावती म्हणावी. महाविद्यालय आणि स्त्रियांसाठीचे स्वतंत्र विद्यापीठ ही कामगिरी अजोड आहे. महर्षी कर्वे यांनी भारतात हे सर्वप्रथम घडवून आणले. या त्यांच्या कामाबद्दल कृतज्ञता म्हणून भारत

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला.

**संदर्भ**


१) आठलेकर मंगला, महापुरुषांच्या नजरेतून स्त्री, मेनका प्रका., पुणे,२००९, पृ. ९.

२) जोशी महादेवशास्त्री (संपा), भारतीय संस्कृतिकोश, खंड १०, प्रका. भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, तृ. आ. २००२, पृ. १९५.

३) पूर्वोक्त, पृ. १९४, ९५, ९६.

४) प्रभू अ. ज. (कार्यकारी संपादक), मनुस्मृति (मराठी भावार्थासह), प्रका. विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, २००३, पृ. ३५३ ते ३५९.

५) जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपा), मराठी विश्वकोश, खंड १६, प्रका. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. ६०८.

६) प्रभू अ. ज., पूर्वोक्त.

७) प्रभू अ. ज., पूर्वोक्त.

८) जोशी महादेवशास्त्री, पूर्वोक्त, पृ. ३२४.

९) राऊत गणेश, इतिहास, मॅकमिलन इंडिया लिमिटेड, पुणे, २००७, पृ. १४८.

१०) आठलेकर मंगला, पूर्वोक्त. पृ. २२.

११) खोले विलास, महर्षी धोंडो केशव कर्वे, गंधर्ववेद प्रका., पुणे, २०१०, पृ. ७९.

१२) अधिक माहितीसाठी पहा, जावडेकर शं. द. (आचार्य), आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रका., पुणे, ३०, १९७९, पृ. २१.

१३) खोले विलास, पूर्वोक्त.

१४) अधिक माहितीसाठी पहा, लेले रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रका, पुणे, १९८४, पृ. ११९ व अन्य.

१५) जोशी लक्ष्मणशास्त्री, पूर्वोक्त, पृ. ६०९.

१६) पूर्वोक्त, ६०९.

१७) पूर्वोक्त, ६०९.

१८) खोले विलास (संपादक), ताराबाई शिंदे लिखित स्त्री - पुरुष तुलना, प्रतिमा प्रका., पुणे, १९९७, पृ. ६१.

१९) अधिक माहितीसाठी पहा, खान अब्दुल हमीद (कार्य.संपा.), महर्षी कर्वे, राष्ट्रीय चरित्रमाला, पुणे, १९८६, चौ. आ.`

२०) कर्वे धोंडो केशव, आत्मवृत्त व चरित्र, प्रका. महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था, पुणे, २०१७ (सारांश स्वरूपात घेतले आहे)

२१) खोले विलास, पूर्वोक्त, पृ.६२.

२२) पूर्वोक्त, ८१.

२३) खान अब्दुल हमीद, पूर्वोक्त, पृ. ५२ (सारांश स्वरूपात घेतले आहे)


***Cite This Article:***
**प्रा. ज्योती राऊत,*(2022).***विधवांचे प्रश्न आणि धोंडो केशव कर्वे यांचे कार्य, ***Electronic International Interdisciplinary Research Journal**, XI (III) May-June, 189 -195.*